International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# मानवी हक्क संरक्षण : जबाबदारी आणि कर्तव्य

**डॉ. मेघा संजय पाटील**

*मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर.*

*Corresponding Author - डॉ. मेघा संजय पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.10952016**

**प्रस्तावना:**

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार (हक्क) होय. हे हक्क त्याला जन्मत:च मिळतात त्याचे कारण मनुष्यप्राणी हा सुध्दा पक्षी प्राणी किंवा समुद्री जीवा सारखा स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला आहे आणि स्वतंत्रेला संलग्न काही मूलभूत अधिकार प्रत्येकाला असतात या विचारला जगभर मिळालेली मान्यता होय. पण ही मान्यता सहजासहजी मिळालेली नाही माणसाने त्यासाठी मोठा संघर्ष केलेला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मुळाशी देखील हाच मानवी प्रतिष्ठेची बुज राखण्याचा विचार होता अमेरिकी राज्यक्रांतीनेही ते तत्व अधोरेखित केले आणि साम्राज्यशाही विरोधात देशो देशी झालेले स्वातंत्र्य लढे हेदेखील मानवी हक्काच्या संरक्षणाच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे ठरलेले आहेत. विसाव्या शतकात मानवतेने दोन महायुद्धांचा विनाशकारी तडाखा सोसला त्यानंतर एका अर्थाने मानवाची सदसदविवबुद्धी पुनश्च जागृत झाली. त्यातून 1948 ला 'यूनीव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राईट्स' अशी घोषणा मानवी हक्काच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने केली. हे घोषणापत्र एका अर्थाने संपूर्ण मानव जातीच्या हक्का चे आणि कर्तव्याचे सुद्धा घोषणापत्र आहे. हे घोषणापत्र म्हणजे प्रत्येकाच्या जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, प्रत्येकाच्या आत्मसन्मानाचा अधिकार आणि समतेचा अधिकार याचा पाया आहे. या घोषणापतत्रा नंतर जगभर विविध देशांनी या हक्कांना घटनेव्दारे किंवा कायदेशीर तरतुदी करून स्वीकारले. भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये प्रत्येकाला सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याया चा अधिकार मान्य केलेला आहे. त्याशिवाय प्रत्येकाला संधी आणि पद यांची समान उपलब्धता मान्य केलेली आहे तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्येही अंगीकारलेली आहेत. थोडक्यात 'यूनीव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राईट्स' आणि भारतीय राज्यघटना या दोन्होंच्या मुळे मानवी हक्काचा पाया घट्ट झाला आहे. परंतु 1993 पर्यंत मानवी हक्काच्या संरक्षणसाठी वेगळी यंत्रणा नव्हती 1993 मध्ये भारतीय संसदेने 'नॅशनल ह्युमन राईट्स प्रोटेक्शन ॲक्ट' मंजूर केला. या कायद्याने आज मानवी हक्काच्या संरक्षणाची एक चौकट उपलब्ध झालेली आहे.

***कि वर्डस: मानवी हक्क , संरक्षण, जबाबदारी, कर्तव्य, राज्यघटना कायदे, उणिवा.***

**अध्ययनाची उद्दिष्टे :**

1. कर्तव्य या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे
2. भारतीय राज्यघटनेचा कर्तव्यासंबंधीच्या विविध तरतुदींची माहिती घेणे.
3. कर्तव्य आणि जबाबदाऱ्या (Duties and Obligations)यांच्यातील भेद जाणून घेणे.
4. कर्तव्यांचे विविध पैलू जाणून घेणे.
5. कर्तव्य आणि मानवी हक्क यांच्यातील परस्परसंबंध जाणून घेणे.

**जबाबदारी आणि कर्तव्य यांच्यातील भेद:**

सर्वसाधारणपणे जबाबदारी आणि कर्तव्ये (Obligations and Duties) या संज्ञा समानार्थी वापरल्या जातात. परंतु या दोन संज्ञात भेद आहे. एच. एल. ए. हार्ट यांच्या मतानुसार कर्तव्य आणि जबाबदारी या संज्ञाचा अर्थ एकमेकांपासून वेगळा आहे. काही वेळेला हक्क हे कोणत्याही जबाबदाऱ्या अंगावर ओढून घेतल्याशिवाय अस्तीत्वात असतात ; परंतु कर्तव्यांचा उदय मात्र स्थान, दर्जा आणि भूमिका यांच्यातून होतो. एच. पी. फेअरचाइल्ड (H. P. Fairchild) यांनी जबाबदारी कर्तव्ये या संज्ञेची व्याख्या पुढील शब्दात केली आहे. – 'स्थान, दर्जा, व्यवसाय यांद्वारे किंवा काही गटांचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे एखाद्या व्यक्तीकडून होणारे वर्तन म्हणजे कर्तव्य होय.' अर्थात हे वर्तन समाजाच्या नैतिक नियमनांना अनुसरून असले पाहिजे. कर्तव्याचा संबंध नेहमी हक्काशी असतो. याउलट जबाबदाऱ्याचा संबंध हक्कांशी जोडता येत नाही. काही जबाबदाऱ्या हक्कांशिवाय ही पार पाडता येतात.

मूलभूत कर्तव्य : संविधानात्मक तरतुदी

भारतीय संविधांनाच्या भाग ४ (क) मध्ये कर्तव्याचा उल्लेख असून कलम ५१ (क) च्या खंड (क) ते (ट) मध्ये यासंबंधी विवेचन असून ते खालीलप्रमाणे –

कलम ५१ (क) : मूलभूत कर्तव्यांच्या या कलमाच्या खंड (क) ते (ट) मध्ये मूलभूत हक्कांसंबंधी पुढील तरतुदी आहेत –

1. संविधानाचे पालन करणे आणि राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास ज्यामुळे स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.
3. भारताची सार्वभौमता, एकता आणि एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे.
4. देशाचे संरक्षण करणे आणे आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.
5. धार्मिक, भाषिक, प्रादेशिक व वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.
6. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

7. वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणे प्राणिमात्रा बाबत दयाबुद्धी बाळगणे.
8. वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि चिकित्साबुद्धी व सुधारणवाद यांचा विकास करणे.
9. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
10. राष्ट्र, उपक्रम व सिद्धी यांच्या सतत चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तीगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.
11. मातापित्याने किंवा पालकाने ६ ते १४ वर्षदरम्यानच्या आपल्या पाल्याला शिक्षणाच्या संधी देणे.

**संविधांनातील कर्तव्याच्या तरतुदीतील उणिवा :**

डॉ. वि. मा. बाचल यांनी संविधांनातील मूलभूत कर्तव्याचे मूल्यमापन करताना संबंधित तरतुदीतील उणिवा लक्षात आणून दिल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत –

1. संविधानात समाविष्ट करण्यात आलेली ही मूलभूत कर्तव्ये अतिशय त्रोटक व संदिग्ध स्वरूपाची आहेत. आपल्या एकात्मिक संस्कृतीचा वैभवशाली वारसा जतन करणे हे एक मूलभूत कर्तव्य संविधानात प्रतिपादन केले आहे; परंतु आपल्या एकात्मिक संस्कृतीचा वैभवशाली वारसा जतन करणे म्हणजे नेमके काय करावयाचे हे स्पष्ट नाही.
2. या मूलभूत कर्तव्यांचे पालन न केल्यास शिक्षेची तरतूद संविधानात नाही; त्यामुळे ही कर्तव्ये निरर्थक ठरतात. प्रत्येक नागरिकाने लष्करी शिक्षण घ्यावे; प्रत्येकाने आपले मतदानाचे कर्तव्ये पार पाडावे, यांसारखी महत्वाची व निश्चित अशी कर्तव्ये दिली नसल्याने कर्तव्यांची यादी अपूर्ण वाटते.
3. नागरिकांच्या कर्तव्याची दुसरी महत्त्वाची बाजू म्हणजे राज्याची कर्तव्ये. त्यांचा उल्लेख मात्र संविधानात नाही.
4. कर्तव्यांच्या संदर्भात घटनेत जरी काही त्रुटी असल्या तरी या कर्तव्यांमधून राष्ट्राचा विकास साधून भारतास एक समर्थ व सार्वभौम राष्ट्र बनविण्याची जबाबदारी नागरिकांवरच असल्याचे स्पष्ट होते. त्या दृष्टीने आपणास राष्ट्रहितास प्राधान्य देऊन भाषावाद, प्रांतवाद, जातिवाद, धर्मवाद यांचा नाश केला पाहिजे. आपल्या या कर्तव्याची जाणीव आपणास झाली व जाणीवपूर्वक आपण आपल्या कर्तव्याचे पालन केले तर भारत खऱ्या अर्थाने सार्वभौम राष्ट्र बनेल. असे झाल्यास भारतास विकसित राष्ट्र बनण्यापासून कोणी रोखू शकणार नाही.

**मूलभूत कर्तव्याचे प्रकार :**

कायद्याचा अभ्यास करणाऱ्या कर्तव्याचे काही प्रकार प्रतिपादन केले आहेत, ते खालीलप्रमाणे –

1) नैसर्गिक व स्व-संपादित कर्तव्ये : कोणत्याही प्रकारच्या संस्था किंवा संघटना यांनी कोणत्याही विशेषीकरणाशिवाय ज्या कर्तव्यांचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक असते. अशा कर्तव्यांना नैसर्गिक कर्तव्ये या संज्ञेने संबोधले जाते. सर्व लोकांनी या प्रकारच्या कर्तव्यांचे पालन स्वेच्छेने करावे अशी अपेक्षा असते. याउलट जी कर्तव्ये व्यक्ती तिच्यातील काही गुणधर्मामुळे आत्मसात करतात किंवा इतरांशी असलेल्या विशिष्ट संबंधांमुळे प्राप्त करतात त्यांना स्वसंपादित कर्तव्ये म्हणतात.

2) सकारात्मक आणि नकारात्मक कर्तव्ये : जॉन रावल्स (John Rawles) या कायदेपंडितच्या मते, कर्तव्ये म्हणजे आपल्यासाठी करण्यात येणारी चांगल्या प्रकारची कर्तव्ये होत. तर दुसरीकडे नकारात्मक कर्तव्ये म्हणजे क्रिया करण्यास एकतर प्रतिबंध करणे किंवा व्यक्तींना त्यापासून परावृत्त करणे होय. सर्वसाधारणपणे जी कर्तव्ये समाजासाठी, गटासाठी तसेच राष्ट्रासाठी फायदेशीर असतात. त्यांच्यासाठी 'सकारात्मक कर्तव्ये' हे संज्ञा वापरली तर याउलट जी कर्तव्ये समाजासाठी, गटासाठी आणि राष्ट्रासाठी धोकादायक असतात ती कर्तव्ये नकारात्मक कर्तव्ये म्हणून संबोधली जातात.

3) पूर्ण आणि अपूर्ण कर्तव्ये : इमॅन्यूअल कांत या जर्मन तत्वज्ञांच्या मते, पूर्ण कर्तव्यांत समाजाने सर्व काळी निश्चित केलेल्या ध्येयानुसार, त्यापासून विचलित न होता व्यक्तीने स्वीकारलेल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याची क्रिया समाविष्ट आहे, तर अपूर्ण कर्तव्ये ही जटिल नसतात किंवा त्यांत जटीलता नसते. अपूर्ण कर्तव्ये ही सत्यवृतीने पूर्ण केले जात नाहीत. या दोन्ही कर्तव्यांच्या पालनाची क्रिया ही त्या त्या समाजाच्या, राष्ट्राच्या, गटाच्या व प्रसंगी व्यक्तींच्या परिस्थितींवर अवलंबून असते.

1) सर्वांगपरिपूर्ण कर्तव्ये :

डब्लुय. डी. रॉस (W. D. Ross) या विचारवंताच्या मतानुसार लोक त्यांची कर्तव्ये, विशेष करून त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार त्यांच्या सदिच्छांची परिपूर्ती करण्यासाठी पार पाडतात. व्यक्तींनी त्यांची कर्तव्ये योग्य तऱ्हेने, तार्किकतेचा किंवा बुद्धिप्रामाण्यवादाचा आधार घेऊन, इतरांच्या हितसंबंधाना बाधा येणार नाही अशा प्रकारे पार पाडण्याचा प्रयत्न करावा.

**मानवी हक्क संरक्षण : राज्याची कर्तव्ये**

मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या संदर्भात प्रत्येक राज्याला काही कर्तव्ये पार पाडावी लागतात ती खालीलप्रमाणे –

1) सर्व मानवी हक्कांचे संरक्षण, प्रोत्साहन आणि अंमलबजावणी करण्याचे कर्तव्ये राज्याचे आहे व ते त्याने पार पाडावे.
2) राज्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या सर्व व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक हक्कांसहित अन्य सर्व मानवी हक्कांचे आणि व्यावहारिक स्वातंत्र्याचे जतन करण्याची खात्री वा आश्वासन द्यावे.
3) मानवी हक्क आणि स्वातंत्र यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योग्य ते कायदे, प्रशासकीय यंत्रणा आणि अन्य योग्य ति पावले उचण्याची खात्री जनतेला देण्याचे कर्तव्ये राज्याला पार पाडावे लागते.
4) मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे बळी पडल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीच्या संरक्षणाची योग्य उपाययोजना करण्याचे कर्तव्ये राज्याने करावे अशी अपेक्षा आहे.
5) मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याचा आरोप असलेल्या व्यक्तींविरुद्ध तपास झटपट व नि:पक्षपाती करण्याचे कर्तव्ये राज्याचे आहे.
6) मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहीरनाम्यात नमूद केलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन हिंसा, धमकी, बदला, दबाव किंवा यांसारख्या अन्य मार्गाचा अवलंब करून होत असेल तर संबंधित व्यक्तींना योग्य ते संरक्षण देणारी उपाययोजना असल्याची खात्री प्रत्येक नागरिकाला देण्याचे कर्तव्ये राज्याचे आहे हे राज्याने लक्षात ठेवावे.
7) नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या संदर्भात लोकांची आकलनशक्ति किंवा समज वाढण्यासाठी योग्य ते प्रोत्साहन देणे राज्याच्या कर्तव्यात येते.
8) मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व त्यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने एखाद्या स्वतंत्र अशा राष्ट्रीय संस्थेची निर्मिती आणि विकास करणे हा राज्याच्या कर्तव्याचा एक भाग होय. या प्रकारच्या राष्ट्रीय संस्थांत लोकायुक्त किंवा मानवी हक्क आयोग यांचा समावेश होतो.
9) सर्व पातळयांवरच्या औपचारिक आणि व्यावसायिक शिक्षणसंस्थांतून मानवी हक्कांचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी योग्य प्रोत्साहन आणि योग्य सुविधा उपलब्ध करून देणे हेही राज्याचे कर्तव्य होय.

**मानवी हक्क संरक्षण : जबाबदारी आणि कर्तव्ये**

कायदेतज्ज्ञ असे मानतात की, मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य हे केवळ राज्याचे नसून राज्यातील जनतेचेही आहे. राज्याबरोबरच राज्यातील प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य आहे की त्याने स्वत:च्या हक्कांचे जतन व संरक्षण करताना

इतरांच्या हक्कांचा आदर करून त्यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**राष्ट्रीय कायद्याची भूमिका**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क जाहीरनाम्यात असाही एक ठराव करण्यात आला होता की, (ज्याद्वारे राज्यावर अशी जबाबदारी टाकण्यात आली होती की) त्यांनी आपापल्या राज्यात मानवी हक्कांची, त्यांच्या तत्त्वांची अंमलबजावणी करून त्यास प्रोत्साहन देण्यासाठी योग्य अशा कायद्यांची निर्मिती व स्वीकार करावा। त्यानुसार प्रत्येक राष्ट्राने आपल्या राज्यात नागरिकांची कर्तव्य निर्देशित करणारा योग्य कायदा मंजूर करावा व ते राज्याचे कर्तव्ये आहे. भारताने हा जाहीरनामा प्रकाशित होण्यापूर्वी सुमारे 23 वर्ष अगोदर 1976 साली झालेल्या घटनेच्या 42 व्या दुरूस्ती कायद्यात नागरिकांच्या कर्तव्यांचा समावेश केला.

**कर्तव्याचा समाजावर होणारा परिणाम :**

प्रत्येक व्यक्तीची समाजाच्या किंवा राज्याच्या संदर्भात काही कर्तव्ये असतात. मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहीरनाम्यानुसार, राज्या प्रती किंवा समाजा प्रती प्रत्येक व्यक्तीने कर्तव्यबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

1) राज्य आणि त्याच्या संस्था यांच्या कायद्याचे आणि अन्य कायदेशीर आदेशाचे पालन करणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्ये आहे.
2) राज्याला त्याच्या संरक्षणासाठी आवश्यक तेव्हा व्यतीने आपल्या सेवा नागरी किंवा सैनिक कार्यासाठी राज्याला सुपूर्द केल्या पाहिजे.
3) सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक कल्याण जास्तीतजास्त प्रमाणात साधण्यासाठी व्यक्तींनी राज्य आणि समुदाय यांना सहकार्य केले पाहिजे.
4) कायद्याने सार्वजनिक उद्देशपूर्ततेसाठी स्थापित केलेले कर सरकारकडे जमा केले पाहिजेत.

त्याचप्रमाणे राज्याने समाजा प्रती खालील कर्तव्ये पार पाडणे आवश्यक असते-

1. समाजातील स्त्रिया, मुले, जखमी व्यक्ति, आजारी माणसे आणि जेष्ठ नागरिक यांचा राज्याने आदर वा सन्मान करावा.
2. इतरांचे हक्क आणि जबाबदाऱ्या यांचा सन्मान राज्याने करावा.
3. कोणत्याही नागरिकाच्या विरोधात चुकीचे आरोप किंवा चुकीची तक्रार राज्याने करू नये.
4. कायदे आणि नियम यांचा राज्याने गैरवापर करू नये.
5. सांप्रदायिक, भाषिक, आणि धार्मिक किंवा अन्य कोणत्याही कारणाने व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यात येईल अशा प्रकारचे विभेदीकरण वा त्याचे समर्थन करू नये.

6. प्रत्येक समाजाशी निगडीत नैतिकता आणि नैतिक मूल्ये यांच्या आज्ञांचे पालन करणे, राज्या कडून अपेक्षित असते.

समाजात अशी अनेक कर्तव्ये असतात जी व्यक्तीने राज्यासाठी आणि समाजासाठी पार पाडावी अशी समाजाची अपेक्षा असते. प्रत्येक राज्याने आणि समाजाने नेमून दिलेल्या कर्तव्याला पुर्णपणे चिकटून राहणे व त्यावर निष्ठा ठेवणे हे राज्याच्या शाश्वत विकासात योगदान दिल्यासारखे आहे, समाज्याच्या व राज्याच्या दृष्टीने हक्क जितके महत्वाचे तितकेच त्यांचे पालन करण्यास लावणारे कर्तव्यही महत्वाचे आहे. हक्कांची अंमलबजावणी व त्यांचे पालन करण्याचे कर्तव्ये याच सहाय्याने राज्य व समाज तणावमुक्त राहू शकेल.

**संदर्भ :**


1. मूळे ज्ञानेश्वर esakal.com 10 sept 2019 ‘मानवाधिकार : मानवी हक्कांचे संरक्षण कवच’.
2. बाचल. वि. म (2017) ‘भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार’ k. sager publication पुणे.
3. कोल्हटकर मेघा (2009) ‘मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना’ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक
4. मानवी हक्क – मानवाधिकार Wikipedia.
5. प्रा कुलकर्णी. पी. के. (2013) ‘मानवी हक्क आणि सामाजिक न्याय’ डायमंड पब्लिकेशन पुणे.